दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

**अनुज्ञेय एफएसआयच्या बदल्यात खाजगी हॉस्पिटलकडून नवीन आरोग्य केंद्रे उभारणार**
**तर कमी पटसंख्या असलेल्या शाळा खाजगी संस्थाना चालविण्यास देणार**
**महापालिका आयुक्तांचा महत्वपूर्ण निर्णय**

ठाणे (१०): आरोग्य केंद्राच्या ठिकाणी असलेला अनुज्ञेय एफएसआय देऊन खाजगी हॉस्पिटलकडून आरोग्य केंद्राची उभारणी करण्याचा तसेच ज्या ठिकाणी कमी पटसंख्या आहे त्या शाळा खाजगी संस्थांना चालविण्यास देण्याचा महत्वाचा निर्णय महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी आज घेतला.

ठाणे महापालिकेच्या शाळा पहिल्या व दुसऱ्या सत्रात भरतात. ज्या शाळांमध्ये पहिल्या अथवा दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी आहे अथवा ज्या शाळांमध्ये विद्यार्थी नाहीत अशा शाळा पीपीपी तत्वावर खाजगी संस्थाना १० वर्षासाठी चालविण्यासाठी देण्यात येणार आहेत.

मात्र त्या बदल्यात त्या त्या शाळांची संपूर्ण निगा व देखभाल, शाळेतील शिक्षकांचा पगार व हजर खर्च हा संबधित संस्थांकडून करणे बंधनकारक राहणार आहे. या बाबतचा प्रस्ताव शिक्षण विभागाने तात्काळ तयार करावा अशा सूचना यावेळी महापालिका आयुक्त श्री जयस्वाल यांनी या बैठकीत दिल्या.

दरम्यान महापालिकेच्या आरोग्य केंद्राच्या ठिकाणी अनुज्ञेय एफएसआय देऊन खाजगी हॉस्पिटलकडून आरोग्य केंद्राच्या इमारतीची उभारणी करण्याचा निर्णयही महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी आज घेतला. या आरोग्य केंद्रांची निगा व देखभाल या खासगी संस्थांकडून करण्यात येण्याच्या अटीवर देण्यात येणार आहेत.

यावेळी ठाणे महापालिकेच्या विविध विभागाचे प्रलंबित लेखा आक्षेप ऑक्टोबर महीनाअखेर तात्काळ निकाली काढण्याचे आदेश महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी संबंधीत अधिकाऱ्यांना दिले आहेत.दरम्यान ज्या विभागाचे लेखा आक्षेप प्रलंबित असतील त्यांनी रात्री उशीरा पर्यत कार्यालयात थांबून लेखा आक्षेप निकाली काढण्याबाबत सूचित केले. तसेच साफसफाईचे काम दिवसाबरोबर रात्रीच्या वेळीही सुरु करण्याबाबत संबधित विभागाला सूचित केले आहे